
आदिवासी साहित्य : संकल्पना, स्वरुप व वाटचाल

एक वाचनीय ग्रंथ



प्राचार्य डॉ.शिवलिंग मेनकुदळे, डॉ.पांडूरंग भोसले, डॉ.सचिन रुपनर, डॉ.पौर्णिमा कोल्हे यांनी आदिवासी साहित्य: संकल्पना, स्वरुप व वाटचाल हा ग्रंथ संपादीत केला असून या ग्रंथाची प्रथम आवृत्ती दि. ५ सप्टेंबर २०२१ रोजी अविष्कार प्रकाशनने प्रकाशित केली आहे !

कोरोना-१९ ची महामारी जगभर थैमान घालीत असतांना पहिल्या व दुसऱ्या लाटेत संपूर्ण लॉकडाऊन आणि भयग्रस्तता असतांना सुध्दा संपादक मंडळाने मोठ्या कष्टाने व जिद्दीने आदिवासी साहित्य निर्मितीच्या हा समग्र जीवनपट साकार केलेला आहे !

सुप्रसिध्द साहित्यिक, दलित ग्रामीण साहित्याचे जेष्ठ अभ्यासक डॉ.नागनाथ कोत्तापल्ले यांनी सद्यकालीन वर्तमान, वास्तव आणि आदिवासी साहित्य यांच्या साक्षेपी वेध घेतला आहे. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील विविध परिवर्तनवादी साहित्य चळवळ आणि आदिवासी साहित्याची चळवळ या सर्वांचा नेमका वेध घेतला आहे !

आदिवासी साहित्याची संकल्पना, प्रेरणा, हेतू, उद्देश, अस्तित्व, अस्मिता तसेच जल, जंगल, जमिनीसाठीचे लढे आजच्या विज्ञान व माहिती तंत्रज्ञानाच्या युगात आदिवासींचा चाललेला हा संघर्ष अस्वस्थ करणारा आहे. अशी खंत डॉ.कोत्तापल्ले यांनी प्रस्तावनेत व्यक्त केली आहे !

या ग्रंथात जुन्या व नव्या पिढीतील अभ्यासकांचा मेळ साधला असून एकूण ५१ अभ्यासक, संशोधक, साहित्यिक, कवी, लेखक, विचारवंत यांचे अभ्यासपूर्ण लेख आहेत. तसेच यात आदिवासी व बिगर आदिवासींचा साहित्य निर्मितीने या ग्रंथाचा अवकाश व्यापलेला आहे. आदिवासी जीवनावरील कविता, कादंबरी, कथा, नाटक, एकांकीका लेखन, चरित्र, आत्मकथन, स्वकथने आदिवासी लोकसंस्कृती व आदिवासींचे लोकसाहित्य, आदिवासी लोकसंस्कृती व आदिवासींचं लोकसाहित्य, आदिवासी लोक रंगभूमी, आदिवासी लोकनृत्य, आदिवासी लोकगिते, आदिवासींचे सामाजिक व सांस्कृतिक जीवन इ. अनेक विषयांवर वैचारित चिंतन आणि सर्वव्यापी चर्चा प्रस्तुत ग्रंथात आहे, हेच या ग्रंथाचे सामर्थ्य आहे !

विशेषत: तो नाटककार, रंगकर्मी, चित्रपट-माहितीपट-लघुपट दिग्दर्शक, कथाकार, पटकथाकार, नाट्य कलावंत, डॉ.पुंडलिक केदारी यांची मी घेतलेली मुलाखतही यात प्रसिध्द झालेले आहे. आज आदिवासी साहित्य चळवळीचा आवाज बुलंद होत असतांनाच्या काळात या ग्रंथाचे महत्व अनन्यसाधारण ठरते. या ग्रंथाची बांधणी उत्कृष्ट व मजबुत असून पाने स्वच्छ व सुबक आहेत, तर मुखपृष्ठावर वारली चित्रकला झळकते. मलपृष्ठावर डॉ.नागनाथ कोत्तापल्ले यांचा सुंदर अभिप्राय आहे. ग्रंथाच्या सामर्थ्यांबरोबरच काही उणीवा राहून गेल्या आहेत, त्या म्हणजे संपादनात आदिवासी नियतकालीके, आदिवासी बोलीभाषा विषयक कार्य, ललित गद्य लेखन, लेख संग्रह, आदिवासी साहित्यावरील विद्यापीठीय प्रबंध लेखन व समिक्षा लेखन इ. बाबी अनावधानाने राहून गेल्या असाव्यात. या उणिवांमुळे मात्र या संपादनाचे महत्व जराही कमी होत नाही. या उणीवा संपादक मंडळ पुढील दुसऱ्या आवृत्तीत निश्चित दूर करतील असा विश्वास आहे !

या ग्रंथात मुद्रण दोष फारसे नाहीत, तर संशोधनाची शिस्त काटेकोरपणे पाळली गेली आहे. या ग्रंथामुळे नवीन अभ्यासक व होतकरु संशोधकांना निश्चित दिशा मिळेल, मार्गदर्शक ठरेल असा या ग्रंथाचा संदर्भमुल्य आहे, असे वाटते. संपादक मंडळाने हा ग्रंथ वाचकांच्या हाती सपुर्त केल्याबद्दल संपादक मंडळाचे सर्व सदस्यांचे हार्दिक हार्दिक अभिनंदन ! त्यांच्या पुढील संपादनास हार्दिक शुभेच्छा !



प्रा.डॉ.ज्ञानेश्वर अंबादास वाल्हेकर
(मो.९४२०९७७८२२)
प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख
बी.डी.काळे महाविद्यालय,घोडेगांव
ता.आंबेगांव जि.पुणे ४१२४०८